स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O)2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
E-mail divsec.kop@gmail.com
EPBX 2696101,102,103,Fax -2690758

क्र.कोविम/माध्य.परीक्षा/४०७०
दिनांक - 06/02/2023

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा,
सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय :- मार्च २०२३ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेच्या प्रवेशपत्रामध्ये विषय, माध्यम, नावातील, आईच्या नावातील, जन्मतारीख व जन्मस्थळ दुरुस्तीबाबत..**

**संदर्भ** - या कार्यालयाचे क्र.कोविमं./माध्य.परीक्षा /४०४५ दि.०३/०२/२०२३ चे पत्र

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापक यांना या पत्राव्दारे कळविण्यात येते की, मार्च २०२३ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी ) परीक्षेची प्रवेशपत्रे (Hallticket) व शालेय विद्यार्थ्यांची यादी दि.०६/०२/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता आपणास ऑनलाईन पध्दतीने प्राप्त होतील. सदर प्रवेशपत्रे व यादी यांची प्रिन्ट काढल्यानंतर विद्यार्थ्यांचे प्रविष्ठ होणारे विषय, माध्यम, विद्यार्थ्यांचे नाव, आईचे नाव, वडीलांचे नाव, आडनाव, जन्मतारीख व जन्मस्थळ तसेच कास्टकोड, आधारकार्ड क्रमांक व इतर कोड आपल्या शालेय अभिलेखाप्रमाणे बरोबर असल्याची खात्री करावी व त्यामध्ये काही दुरुस्ती असल्यास सोबतच्या प्रपत्रच्या नमून्याप्रमाणे दुरुस्तीबाबतचे **प्रस्ताव या कार्यालयास परीक्षा सुरु होण्यापुर्वी दोन दिवस अगोदर प्रती दुरुस्ती रु.५०/- प्रमाणे शुल्कासह पोहोच होतील या बेताने पाठविण्यात याव्यात.**

तथापि **विषय व माध्यम दुरुस्ती** असल्यास वरील दुरुस्तीचा प्रस्ताव विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रासह **समक्ष प्रती दुरुस्ती रु.१००/- प्रमाणे शुल्क भरुन** या कार्यालयास सादर करुन आवश्यक ती दुरुस्ती प्रवेशपत्रावर करुन घ्यावी जेणेकरुन विद्यार्थ्यांस त्या विषयाची तसेच त्या माध्यमाची प्रश्नपत्रिका पुरविणे तसेच संबंधित केंद्रसंचालकास कळविणे इत्यादी कार्यवाही करुन त्या विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

(डी.एस.पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत - विहित नमून्यातील दुरुस्ती तक्ता

100 – d/khamkar sm 10th exam / 11th cet prakatan letter format

# प्रवेशपत्रिकेतील / शाळा यादीतील चुकीच्या दुरुस्तीसाठी कळविण्याचे प्रपत्र

**To be submitted before Examination**

प्रपत्र परीक्षापूर्व दोन दिवसापर्यंत समक्ष सादर करणे आवश्यक आहे.

शाळा क्रमांक : | | | | | | | |

## S. S. C. Examination of March / October - 201

**Proforma Indicating Errors In the Seat No. Wise School List of Candidates.**

| No.<br>क्र. | Seat No.<br>बैठक क्रमांक | Name of the Candidate<br>विद्यार्थ्याचे नांव | Original Position in the School List<br>शाळा यादीतील नोंद | Correct position As per the School Record<br>शाळा दप्तराप्रमाणे आवश्यक दुरुस्ती | Application Form No.<br>आवेदनपत्र क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

प्रपत्र इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे.

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका

स्थळ :

दिनांक :